- 5 NOV 2023

लोकसत्ता

# डॉ. तुकाराम डोंगळे यांना प्रा. मनमोहन शर्मा पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार-जाहीर झाल्याबद्दल डॉ. तुकाराम डोंगळे यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना मराठी विज्ञान परिषदेचा भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात, विशेषतः संशोधन क्षेत्रात ऋषितुल्य असलेले 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार-२०२३' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

अत्यंत कमी वयात हा पुरस्कार मिळविणारे डॉ. डोंगळे हे पहिलेच अध्यापक-संशोधक आहेत. हा पुरस्कार मिळविणारे शिवाजी विद्यापीठातीलही ते पहिलेच शिक्षक असल्याचे बुधवारी सांगण्यात आले. एक लाख रुपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. डोंगळे यांचे संशोधन प्रामुख्याने मेमरी डिव्हायसेस, न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात असून ते राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे सुमारे १६० पेक्षा अधिक शोधनिबंध, ३ पुस्तके व ११ पेटंट त्यांच्या नावे नोंद आहेत. त्यांच्या दहापेक्षा जास्त शोधनिबंधांना विविध ख्यातनाम अशा आंतरराष्ट्रीय नियतकालिकांच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध होण्याचा बहुमान प्राप्त झालेला आहे.

सुमारे १२ कोटी रुपये इतक्या निधीचे सहा संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. अमेरिका, कोरिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ग्रीस इत्यादी देशांतील शास्त्रज्ञांसमवेत त्यांचे आंतरराष्ट्रीय सहयोगी संशोधन चालू आहे.

डॉ. डोंगळे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाल्याचे समजताच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी डॉ. डोंगळे यांना दालनात आमंत्रित करून ग्रंथभेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. जगदीश सपकाळे, उपकुलसचिव गजानन पळसे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचे विद्यार्थी चमकले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये बी.टेक. फूड टेक्नॉलॉजीच्या द्वितीय वर्षामध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एडीसीईटी)मार्फत घेण्यात आलेल्या 'कुकिंग विदाउट फायर' आणि 'आयडियाथॉन' स्पर्धेत यश संपादन केले.

यात विराज किरण पवार, प्रेमराज कैलास साळुंखे आणि सागर सुधीर मोरे या विद्यार्थ्यांना आयडियाथॉन स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त झाला असून, या विद्यार्थ्यांनी 'द फ्युचर ऑफ फार्मिंग: हाइड्रोपोनिक्स अँड एरोपोनिक्स' या विषयावर सादरीकरण केले. नितीन विलास सोन्ने व नंदिनी उत्तम साळवी यांना कुकिंग विदाउट फायर या स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला. त्यांनी गाजर, बदाम, काजू, खोबरे आणि कंडेन्स्ड मिल्क या पदार्थांचा वापर करून पौष्टिक लाडू बनविले. या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ.एस.एन. सपली, फूड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ.इरांणा उडचान, सहायक प्राध्यापक वैभव बागे, डॉ.सिद्धार्थ लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ३ हजार ८४९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस तीन हजार ८४९ विद्यार्थी बसले. त्यापैकी ३५७ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली ११, कोल्हापूर ३ व सातारा ३ असे तिन्ही जिल्ह्यातून १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेला ३४९२ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षेदरम्यान ५३ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. शनिवारी १४ विषयांसाठी ३ हजार ४९२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ११, कोल्हापूरात ३, साताऱ्यात ३ असे तिन्ही जिल्ह्यातून १७ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.